जळगाव महापालिकेत भाजपच्या सत्तेची वर्षपूर्ती ना पालिकेची कर्जमुक्ती ना गाळे प्रश्न सुटला

■ जळगाव, प्रतिनिधी

जळगाव महापालिकेतील भाजपच्या सत्तेला एक वर्ष झाले, मात्र या सत्तापक्षाने निवडणुकीत केलेल्या कोणत्याच आश्वासनांची पूर्तता केलेली नाही. महापालिकेवर शेकडो कोटींच्या कर्जाचा डोंगर आहे तसाच आहे. महत्त्वाचा गाळे प्रश्न सुटलेला नाही. सर्वच रस्त्यांची वाट लागली आहे आणि कर भरणाऱ्या नागरिकांना आवश्यक नागरी सुविधाही मिळत नाहीत. जलसंपदा मंत्री गिरीश महाजन यांच्या नेतृत्वात झालेल्या गेल्या वर्षीच्या महापालिका निवडणुकीत जळगावकरांनी २८ वर्षे जुनी सुरेश जैन यांची सत्ता उलथवून लावीत भाजपला प्रचंड बहुमत दिले होते हे विशेष.

जळगाव शहर महापालिकेच्या गत वर्षाच्या निवडणुकीत गिरीश महाजन यांच्या नेतृत्वात भाजपच्या पारड्यात स्थानिक मतदारांनीं ७५ पैकी तब्बल ५७ जागा निवडून दिल्या होत्या. वास्तविक या पालिकेत ज्येष्ठ नेते माजीमंत्री एकनाथ खडसे यांनीही भाजपच्या सत्ता स्थापनेचा प्रयत्न केला होता, परंतु २० -२२ जागांच्या वर त्यांना यश मिळालेच नव्हते. तथापि जिल्हा भाजप किंबहुना राज्यमंत्री मंडळातून खडसे यांची गच्छंती व महाजन हे आघाडी सांभाळताच जळगावकर मतदारांना नवा आशेचा किरण दिसला असावा. म्हणूनच महापालिकेत ५७ इतक्या प्रचंड बहुमताच्या जागा निवडून आल्या.

निवडणुकीत गिरीश महाजन तसेच स्थानिक पदाधिकाऱ्यांनी (खडसे सोडून) येथील मतदारांना मोठी आश्वासने दिली होती. त्यात जळगाव महापालिकेवर हुडको आणि जिल्हा बँकेचे सुमारे ४०० कोटींचे कर्ज आहे. त्या कर्जातून महापालिकेला सहा महिन्यात मुक्त करू हे त्यातील एक आश्वासन होते. त्याच प्रमाणे रेंगाळलेला गाळे प्रश्न ते मार्गी लावणार होते. हे दोन्ही प्रश्न तसेच आहेत. उलटपक्षी हुडकोच्या थकीत कर्जापायी महापालिकेची बँक खाती सील झाली होती.

ढेबेवाडी खोऱ्यातील मालदनजवळ चौपदरी रस्ता ५ फूट खचला

■ ढेबेवाडी

कराड-ढेबेवाडी या चौपदरीकरण केलेल्या मार्गावरील रस्ता मालदन फाटा ते ढेबेवाडी पुलाजवळ पाच फूट खचल्याची घटना घडली. मुसळधार पावसामुळे जमिनीत पाणी मुरुन हा प्रकार घडल्याचा अंदाज व्यक्त केला जात आहे.

या भागात परवाच रस्त्याला काही ठिकाणी तडे गेल्याचे पादचारी आणि वाहनचालकांच्या निदर्शनास आले होते. मात्र काल सकाळी या तड्यांचे रुपांतर भेगांत झाले. दुपारनंतर तर हा भाग ५ फूट खचला गेला. सुमारे तीन वर्षांपूर्वीच चौपदरीकरण केलेला रस्ता खचल्याचे कळताच परिसरात एकच खळबळ उडाली. सध्या पोलिसांनी या भागात बॅरिकेट्स लावून वाहतूक बंद करून ती एकेरी केली आहे.

मागील दोन दिवसांपासून ढेबेवाडी खोऱ्यात मुसळधार पाऊस कोसळत आहे. काळगाव भागात काही गावांमध्ये पाणी शिरले आहे. गेल्या २५ वर्षांत इतका तुफानी पाऊस पाहिला नाही असे इथले जुने ग्रामस्थ सांगत आहेत. भटेवाडीतील फाट्याजवळ दगडी ताल तुटून पाणी शेतात घुसल्याने चार एकरातील भुईमूग आणि भाताचे उभे पीक वाहून गेले.

जमशेदपूरमधील पोलाद क्षेत्रातील तब्बल ३० कंपन्या प्रचंड मंदीमुळे बंद

■ जमशेदपूर

झारखंडमधील जमशेदपूर येथील आदित्यपूर औद्योगिक वसाहतीतील पोलाद क्षेत्राशी संबंधीत तब्बल ३० कंपन्या बंद पडल्या आहेत. धक्कादायक बाब म्हणजे वाहन क्षेत्रातील प्रचंड मंदीमुळे या कंपन्यांना बंदीच्या खाईत लोटले आहे.

वाहन विक्री घटल्यामुळे टाटा मोटर्सने गेल्या महिन्यात चार वेळा काम बंद केले होते. यावेळी गुरुवार ते शनिवार काम बंद ठेवले. शनिवारी सुट्टीच असल्यामुळे कारखाना बंद असतो. हंगामी १६ हजार कामगारांना १२ दिवसांची सुट्टी दिली असून त्यांना १२ ऑगस्टलाच कामावर बोलावले आहे. तर कायमस्वरुपी कामगारांना ५ ऑगस्टला कामावर बोलावले आहे. मारुती सुझुकीनेही ६ टक्के कामगार कपात केली आहे.

त्यामुळे वाहन कंपन्यांची अशी अवस्था असल्याने पोलाद क्षेत्रातील कंपन्या नाईलाजाने बंद कराव्या लागल्या आहेत. सुमारे डझनभर कंपन्या याच आठवड्यात गुरुवारपासून बंद करण्यात आल्या आहेत.

शिक्षण समितीचे सभापतिपद कोणाला? आज फैसला! इच्छुकांमध्ये रस्सीखेच

■ पिंपरी, प्रतिनिधी

पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या शिक्षण समिती सभापतिपदासाठी येत्या सोमवारी ५ ऑगस्ट रोजी दुपारी तीन ते पाच या वेळेत अर्ज भरायचे आहेत. त्यामुळे अर्ज भरल्यानंतर लगेच सभापती कोण होणार हे स्पष्ट होणार असून सभापतिपदाची प्रत्यक्ष निवडणूक ९ ऑगस्ट रोजी दुपारी बारा वाजता होणार आहे.

पक्षीय बलाबलानुसार सत्ताधारी भाजपच्या चंदा लोखंडे, सागर गवळी, निर्मला गायकवाड, मनीषा पवार, शशिकांत कदम, राष्ट्रवादी काँग्रेसच्या वैशाली काळभोर, सुलक्षणा धर, भाऊसाहेब भोईर आणि शिवसेनेच्या रेखा दर्शले अशा ९ सदस्यांची २५ जुलै रोजी झालेल्या महासभेत निवड करण्यात आली आहे. समितीत भाजपचे वर्चस्व असल्याने सभापती, उपसभापती भाजपचा होणार हे निश्चित आहे. पुण्याचे विभागीय आयुक्त डॉ. दीपक म्हैसकर यांनी शिक्षण समिती सभापतिपदाचा निवडणूक कार्यक्रम जाहीर केला आहे.

मागाठाणे विधानसभा क्षेत्रातील भिमनगर, कांदिवली (पूर्व) येथील मुस्लिम समाजातील तरूणांनी भाजपा आमदार प्रवीण दरेकर यांच्या उपस्थितीत इमरान मेहबूब शेख, नदीम सय्यद, अक्रम शेख, निजाम सय्यद, मुजफ्फर शेख, रोशन शेख, निसार शेख, अफरोज पठाण, दस्तगीर सय्यद, ताहीर पटेल, सुलतान शेख, सद्दाम शेख, हमिद शेख तसेच दिलीप जमादार, रमेश नायर, प्रवीण गया, गौतम पैठणे, मोन्या लोंढे आदी असंख्य कार्यकर्त्यांनी प्रवेश करून भाजपा सदस्यत्व स्वीकारले. यावेळी माजी नगरसेवक प्रकाश दरेकर, मंडळ अध्यक्ष मोतीभाई देसाई, अविनाश शिंदे व दिलीप उपाध्याय उपस्थित होते.

डॉ. बाबा आढाव उद्यापासून बेमुदत उपोषणाला बसणार

■ सातारा, प्रतिनिधी

राज्यातील मापाडी व माथाडी कामगारांचे प्रश्नावर सरकारने तातडीने हस्तक्षेप करून ते सोडवावेत म्हणून, महाराष्ट्र राज्य हमाल - मापाडी महामंडळाचे अध्यक्ष डॉ. बाबा आढाव येत्या मंगळवार पासून बेमुदत उपोषणाला बसणार असल्याची माहिती, महामंडळाचे सरचिटणीस साथी सुभाष लोमटे यांनी प्रसिद्धी पत्रकाद्वारे दिली आहे.

परिपत्रकाचा चुकीचा अर्थ लावून, मापाडी व माथाडी कामगारांची कुचंबणा करणारा एका बाजूला व्यापारी वर्ग, व दुसऱ्या बाजूला, बध्याची भूमिका घेणारा अधिकारी वर्ग, ज्यामुळे माथाडी कामगारांचे प्रचंड मानसिक व आर्थिक खच्चीकरण होत असल्याने, त्यांनी सोमवारपासून पुणे येथे बेमुदत काम बंद आंदोलन सुरू केले आहे. यात राज्याचे मुख्यमंत्री व पणन मंत्र्यांनी तात्काळ हस्तक्षेप करून, तात्काळ प्रश्न मार्गी लावावेत, म्हणून डॉ. बाबा आढाव हे मंगळवार ६ ऑगस्ट पासून पुणे गुलटेकडी येथील मार्केट यार्डात बेमुदत उपोषण सुरू करणार आहेत.

www.pritirane.com

प्रो. प्रिती राणे यांचे शेअर मार्केट

आर्थिक प्रगती साठी एक उत्तम पर्याय

मोफत माहिती सत्र वेळ- सायं. 6.30 ते 8.30

MBA in Finance

8976028245
8655018245

ठाणे : आज सोम. 5 ऑगस्ट
मंगला हायस्कूल हॉल, ठाणे रेल्वे स्टेशन समोर, ठाणे-पूर्व

दादर : उद्या मंगळ. 6 ऑगस्ट
सद्गुरू हॉल, जनता भाजी मार्केट जवळ, दादर-पश्चिम

शिवसेना पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांच्या वाढदिवसानिमित्त सालाबादप्रमाणे प्रभाग क्र.४९ च्या नगरसेविका संगीता संजय सुतार व शिवसेनाच्या वतीने विभागातील सन २०१९च्या बोर्डाच्या परीक्षेत दहावी, बारावी व पदवीधर उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांचा सत्कार आयोजित केला होता. त्यावेळी समाजसेवक संजय सुतार, मच्छिमार नेते किरण कोळी, समाजसेवक बाबू सुतार, शाखाप्रमुख संदेश घरत, उपविभाग अधिकारी नितिन कासकर, हरबादेवी (ग्रामदेवी) मंदिर ट्रस्टचे अध्यक्ष महेश पाटील, शाखा समन्वयक उपेश कोळी, महिला उपशाखा संघटक सुशिला पाटील, अनघा सातारे, उपशाखा प्रमुख प्रभाकर कोळी, मोरेश्वर कोळी, शैलेश केरकर, ग्राहक संरक्षण कक्षाचे राकेश साळे व ज्येष्ठ शिवसैनिक नरेश ठाकूर, अशोक साबे, मायकल किल्मो, भास्कर कोळी, देवराम भगत तमाम शिवसैनिक, विद्यार्थी उपस्थित होते.

संत गोरोबाकाका मातीकला बोर्डाच्या स्थापनेसाठी आमरण उपोषणाचा इशारा

■ मुंबई

श्री संत शिरोमणी गोरोबाकाका मातीकला बोर्डाच्या स्थापनेतील सरकारची दिरंगाई व दुर्लक्षाच्या निषेधार्थ डोंबिवलीचे सामाजिक कार्यकर्ते दिनकर छत्तीसकर यांनी १५ ऑगस्टपासून मुंबईतील आझाद मैदानात आमरण उपोषण आंदोलन करण्याचा इशारा दिला आहे. याबाबत छत्तीसकर यांनी थेट मुख्यमंत्र्यांनाच आपल्या मागणीचे निवेदन पाठविले आहे.

मार्च २०१८ मध्ये राज्य सरकारने श्री संत शिरोमणी गोरोबाकाका मातीकला बोर्ड, वर्धा येथे स्थापन करण्यासाठी अंदाजपत्रकात दहा कोटी रुपयांच्या नियतव्ययाची तरतूद केली. त्यास दिड वर्ष होत आले आहे. तसेच विद्यमान राज्य सरकारची मुदतही संपत आली आहे. मात्र अद्याप मातीकला बोर्ड स्थापन झालेले नाही. २०१९-२०२० साठी तर मातीकला बोर्डासाठी राज्य शासनाच्या उद्योग विभागाने आणि महाराष्ट्र राज्य खादी व ग्रामोद्योग मंडळाने वित्त विभागाकडे तरतुदीची मागणीच केली नाही. त्यामुळे अर्थसंकल्पात काहीही तरतूद झालेली नाही. त्यामुळे महाराष्ट्रातील कुंभार समाजात शासनाने मातीकला बोर्डाचे गाजर दाखवून तोंडाला पाने पुसल्याची भावना निर्माण झाली आहे. त्यामुळे हे आंदोलन केले जाणार आहे.

८ मार्च २०१९ च्या राज्य शासनाच्या उद्योग विभागाने काढलेल्या शासन निर्णयात मातीकला बोर्डासाठी नियमित अध्यक्षाच्या नेमणुकीची तरतुदच केलेली नाही. तरी मातीकला बोर्डासंबंधातील कार्यवाहीला गती येण्यासाठी मातीकला बोर्डावर कुंभार समाजातील मान्यवर व्यक्तीची अध्यक्ष म्हणून नेमणूक तातडीने व्हावी. तसेच सन २०१९-२०२० चे अंदाजपत्रकात महाराष्ट्र राज्य खादी व ग्रामोद्योग मंडळासाठी केलेल्या अर्थसंकल्पीय तरतुदीतून मातीकला बोर्डासाठी किमान १० कोटी रुपये उपलब्ध करून देण्याबाबत शासन आदेश व्हावेत. मातीकला बोर्ड स्थापनेबाबत आणि त्यासाठीच्या अंदाजपत्रकीय तरतुदीबाबत अक्षम्य दिरंगाई व दुर्लक्षाबाबत राज्य शासनाचा उद्योग विभाग व महाराष्ट्र राज्य खादी व ग्रामोद्योग मंडळाचे अधिकारी व पदाधिकारी यांचे विरुद्ध जबाबदारी निश्चित होऊन करवाई व्हावी अशी मागणी छत्तीसकर यांनी केली आहे.

जेट एअरवेज (इंडिया) लिमिटेड

(कॉर्पोरेट इन्सॉल्व्हन्सी ठराव प्रक्रियेअंतर्गत)

स्वारस्याची अभिव्यक्ती सादरीकरणाच्या अंतिम वेळेत विस्तार

आयबीसी, २०१६च्या अनुच्छेद २५ (२) (एच) च्या तरतुदीअंतर्गत जेट एअरवेज (इंडिया) लिमिटेड (जेट एअरवेज)च्या प्रकरणी ठराव आराखडा सादरीकरणासाठी प्रस्तावित ठराव अर्जदारांकडून स्वारस्याची अभिव्यक्ती (ईओआय) आमंत्रित करणारी सूचना दि. २०.०७.२०१९ रोजी इकॉनॉमिक टाइम्सच्या सर्व आवृत्त्यांमध्ये व अन्य प्रादेशिक वर्तमानपत्रांत प्रसिद्ध झाली होती. जेट एअरवेजच्या प्रकरणी प्रस्तावित ठराव अर्जदारांकडून ईओआय स्वीकृतीची अंतिम तारीख दि. १० ऑगस्ट, २०१९ रोजी दु. ४.०० (भा. प्र. वे.) पर्यंत विस्तारित करण्यात आली आहे. सूचना दि. २० जुलै, २०१९ करिताच्या उर्वरित अटी व शर्ती तसेच अद्ययावत ईओआय प्रक्रिया दस्तावेजासमवेत अद्ययावत फॉर्म जी जेट एअरवेजची वेबसाइट(https://www.jetairways.com/insolvencyproceedings)वर अपलोड करण्यात आला आहे तसेच आयबीबीआयची वेबसाइट https://ibbi.gov.in/resolution-plans वरही प्रसिद्ध करण्यात आलेला आहे. कोणतेही स्पष्टिकरण वा पुढील माहितीसाठी कृपया fly.jetairways@in.gt.com या ई-मेल आयडीवर लिहावे.

सही/-
आशिष चवचारिया, ठराव अधिकारी
(IBBI/IPA-001/IP-P00294/2017-18/10538)
आयबीबीआयकडे नोंदणीकृत पत्ता व ई-मेल आयडी
ग्रॅन्ट थॉरन्टन १० सी हंगरफोर्ड स्ट्रीट, कोलकाता - ७०० ०१७.
ई-मेल ashish.chhawchharia@in.gt.com
जेट एअरवेज (इंडिया) लिमिटेडकरिता

दि. ०५ ऑगस्ट २०१९
ठिकाण : मुंबई

अल्पवयीन मुलीचा गळफास लावलेला मृतदेह सापडला

मुंबई, प्रतिनिधी- पंधरा वर्षांच्या अल्पवयीन मुलीची गळफास लावलेल्या स्थितीत मृतदेह काळबादेवी येथील सार्वजनिक शौचालयात सापडल्याने परिसरात प्रचंड खळबळ उडाली होती. या मुलीच्या शरीरावर मारहाणीच्या जखमा असून तिची मारहाण करून तसेच तिच्यावर लैंगिक अत्याचार झाल्याचा आरोप तिच्या कुटुंबियांनी केला आहे.

त्यामुळे तिचा मृतदेह शवविच्छेदनासाठी पाठविण्यात आला आहे. या अहवालानंतर काही गोष्टींचा खुलासा होईल असे पोलिसांनी सांगितले. दोन दिवसांपासून मिसिंग असलेल्या या पंधरा वर्षांच्या मुलीचा मृतदेह सापडल्याने स्थानिक रहिवाशांमध्ये प्रचंड खळबळ उडाली आहे. पंधरा वर्षांची ही मुलगी काळबादेवी येथील तिच्या कुटुंबियांसोबत राहत होती. तिला सात बहिणी असून तिचे वडिल कुलाबा येथे गजरे विक्रीचे काम करतात. दोन दिवसांपूर्वी ती घरातून निघून गेली आणि परत घरी आली नाही. त्यामुळे तिच्या पालकांनी तिचा सर्वत्र शोध घेतला. मात्र शोध घेऊनही ती कुठेच सापडली नाही. त्यामुळे तिच्या पालकांनी एल. टी. मार्ग पोलीस ठाण्यात तिची मिसिंगची तक्रार केली होती. या तक्रारीची पोलिसांनीही गंभीर दखल घेत तिचा शोध सुरू केला होता. ही शोधमोहीम सुरू असतानाच रविवारी सकाळी तिचा मृतदेह काळबादेवीतील दवाबाजारच्या एका सार्वजनिक शौचालयात दिसून आला. तिचा मृतदेह गळफास लावलेल्या स्थितीत होता, तिने आत्महत्या केली आहे का?याचा आता पोलीस तपास करीत आहे.

कसारा घाटात दरड कोसळली

मुंबई- मुसळधार पावसाने कसारा घाटातही आज सायंकाळच्या सुमारास दरड कोसळल्याची घटना घडली. दरड कोसळल्याने रस्ते, रेल्वे मार्ग पुर्णपणे ठप्प झाले होते. त्यामुळे प्रवाशांचे अतोनात हाल झाले.

TENDER NOTICE

INVITING OFFERS FOR PURCHASE

The Bombay Society of the Srs. of Charity of STS. BARTOLOMEA C. & VINCENZA G. having address at Yuvathi Sharan, P. Balu Marg, Prabhadevi, Mumbai 400 025 hereby call upon the prospective bidders to submit their offers/bids with respect to the sale of the undermentioned premises subject to the sanction of the Charity Commissioner under the Bombay Public Trust Act.

The detailed terms and conditions of the proposed sale are as set out in the Tender Form. The Tender Forms will be available at the office of the undersigned at Yuvathi Sharan, P. Balu Marg, Prabhadevi, Mumbai 400 025 from 6th to 9th August 2019 on any working day during 11.00 a.m. to 5.00 p.m. on payment of non-refundable fee of Rs.500/- in cash, per tender form. The last date for submitting the bids is 20th August 2019 upto 5.00 p.m. and the sealed offers will be opened at the office of the undersigned on 21st August, 2019 in the manner more particularly described in the Tender Form.

THE PREMISES ABOVE REFERRED TO

Sr. No.	Flat No./Floor	Admeasuring (built up)	Building No.
1.	5 - ground	919	C4
2.	10 - first	889	C6
3.	6 - first	889	C4

in the Citizen Housing Complex, Naigaon, Vasai on land bearing Survey No. 250, 251, 252 Hissa no. 7 at Village Juchandra, Taluka Vasai, District Thane.

Dated this 5th day of August, 2019.

Sd/-
For The Bombay Society of the Srs. of Charity of STS. BARTOLOMEA C. & VINCENZA G.
Sr. Irene Fernandes

पावसानेही चढली कोर्टाची पायरी

पनवेल-पावसामुळे शहराचा काही भाग पाण्यात असताना आज पावसानेही कोर्टाची पायरी चढली. पनवेलच्या कोर्टातदेखील पावसाचे पाणी शिरले होते. मात्र आज सुट्टीमुळे या पावसाचा कामकाजात व्यत्यय आला नाही.

पावसाने थांबवला 'रात्रीस खेळ चाले'

सिंधुदुर्ग-सिंधुदुर्ग जिल्ह्यातील पावसाचा फटका 'रात्रीस खेळ चाले' या दुसऱ्या पर्वातील मालिकेलाही बसला आहे. सावंतवाडीत उभारलेला या मालिकेतील सेट पाण्याने वेढला गेला आहे. त्यामुळे अखेर चित्रिकरण थांबवण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.

बृहन्मुंबई महानगरपालिका

क्र. : Dy.Ch.E/SP/3418 /P&D/e-Tender no.8/Notice No.4, 2019-20 dt. 02.08.2019

ई-निविदा सूचना

विभाग	मुख्य अभियंता (मलनिःसारण प्रकल्प)
अनुभाग	उपमुख्य अभियंता (मलनिःत्सारण प्रकल्प) पी ॲन्ड डी
निविदा क्र.	Dy.Ch.E/S.P./8 /P&D/e-tender 2019-20
बोली क्र.	७१००१५३२१४
विषय	'एस' विभागात जयदीपनगर, नाहूर (पू.) येथे राहून गेलेल्या जोडणीकरिता ४०० मिमी व्यासाच्या आरसीएनपी ३ क्लास मलनिःसापण पाइपची तरतूद करून बसवणे.
निविदा विक्री	दि.०५.०८.२०१९ रोजी स. ११.०० नंतर ते दि. १३.०८.२०१९ रोजी दु.१४.०० पर्यंत
बृ.मुं. मनपा पोर्टल	http://portal.mcgm.gov.in
सदर निविदा सूचनेसंदर्भात कोणत्याही माहितीसाठी संपर्क साधावा	ए.ओ.(एस.पी.)पी ॲन्ड डी
ए) नाव	श्री. मिलिंद टोपकर. ए.ओ.(एस.पी.)पी ॲन्ड डी
बी) ऑफिस टेलिफोन नं.	०२२ २४९५७८१३
सी) मोबाईल नं.	९८६७८२८५९०
डी) ई-मेल आयडी	dychesp_pnd@rediffmail.com

सही/-
श्री. एस.एच. राठोड
उपमुख्य अभि.(मलनिःसारण प्रकल्प)
नियोजन व रचना (आय/सी)

पीआरओ/६९३/जाहि./१९-२०

कुठेही पाणी साचू देऊ नका, डासांना निमंत्रण देऊ नका.

सहकारी पतसंस्थाना विशेष सवलत..

आपल्या संस्थेची वार्षिक सर्वसाधारण सभा (AGM) नोटीस, इतर सर्व जाहीरातीसाठी तात्काळ संपर्क करा.

सागर शिंदे
96198 40575
93220 41622
022- 6747 2208

E-mail : harshadamedia@gmail.com

नवी मुंबई महानगरपालिका

शहर अभियंता विभाग

फेरनिविदा सूचना क्र.नमुंमपा/ब-1/ का.अ.(तुर्भे)/ 176/2019-20

अ. क्र.	कामाचे नांव	अंदाजपत्रकिय रक्कम (रू.)
1	तुर्भे गाव येथील पदपथाची सुधारणा करणे.	23,23,945/-
2	तुर्भे प्र.क्र.57 से.22 येथील भुखंड क्र. 85 ते 90,243 ते 267,240 ते 249 समोरील हेवी डयुटी ड्रेनची सुधारणा करणे.	23,89,637/-
3	तुर्भे सेक्टर 21 येथील आदर्श मैदानाची संरक्षक भिंत बांधणे.	रू.16,22,765/-
4	तुर्भे प्र.क्र.67 से.21 येथील आदर्श मैदान ते आय.सी.एल. शाळेपर्यंत रस्ता व S.W.Drain ची सुधारणा करणे.	रू.12,66,053/-
5	तुर्भे विभागातील सायन-पनवेल हायवेजवळ सानपाडा सर्विस रस्त्यालगत मोकळया जागेचे सुशोभिकरण करणे.	रू.8,46,880/-

या निविदेबाबतची विस्तृत माहिती नवी मुंबई महानगरपालिकेचे संकेतस्थळ www.nmmcgov.com व www.maharashtra.etenders.in यावर प्रसिद्ध करण्यात आलेली आहे. संबंधित निविदाकारांनी याची नोंद घ्यावी.

सही /-
कार्यकारी अभियंता (तुर्भे)
नवी मुंबई महानगरपालिका

जाक्र-नमुंमपा/जसं/जाहिरात/540/2019